# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६**
ई-मेलः **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट www.mercindia.org.in

**प्रकरण क्र. २०११/७०** **जाहिरात क्र. ६/२०११-१२**

**विद्युत अधिनियम, २००३ (विअ, २००३) च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) खाली नोटीस**

१. मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा) यांनी विद्युत अधिनियम २००३, च्या कलम १४ सह कलम १५ च्या तरतुदीअंतर्गत १६ ऑगस्ट, २०११ पासून २५ वर्षांच्या कालावधीसाठी **पारेषण परवाना** मंजूर करण्यासाठी दि. १३ मे, २०११ रोजी अर्ज दाखल केला आहे. आरइन्फ्राने त्यांच्या परवान्यासाठीच्या अर्जात सादर केले आहे की, आरइन्फ्रा विद्यमान मानीव पारेषण परवानाधारक असून मुंबईतील व मुंबईच्या परिसरातील उपनगरांमधील ग्राहकांची वीज पुरवठ्याची गरज भागविण्यासाठी विजेचे पारेषण करते.

२. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (२) सह महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ मधील विनियम ६ नुसार **आर-इन्फ्राने**, त्यांच्या **पारेषण परवान्याच्या अर्जाची** नोटीस ‘टाईम्स ऑफ इंडिया’, ‘हिन्दुस्थान टाईम्स’, ‘लोकसत्ता’ आणि ‘सामना’ या वर्तमानपत्रांच्या दि. ३१ मे, २०११ रोजीच्या आवृत्त्यांमध्ये मध्ये प्रसिध्द केली.

३. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग ( पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ प्रमाणे, **पर्याय १** मध्ये असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य हे पारेषण परवान्याचे क्षेत्र राहील आणि **पर्याय २** मध्ये असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे की, **हा परवाना, पारेषण वाहिन्या, उप-केंद्रे आणि संबंधीत उपकरणे स्थापन करण्यासाठी व त्यांच्या संचालनासाठी राहील. आरइन्फ्राने** मंजुरीसाठी सादर केलेल्या अर्जातील पारेषण परवाना हा **पर्याय १** खाली **महाराष्ट्र राज्याकरिता क्षेत्र विशिष्ट पारेषण परवान्याशी** संबंधित आहे.

४. पारेषण परवाना मंजूर करण्यासाठीच्या अर्जात प्रस्तावित केलेल्या पारेषण वाहिन्या, उप-केंद्रे आणि संबंधित उपकरणे यांच्या संपूर्ण तपशीलासाठी इच्छुक व्यक्तीने आरइन्फ्राचा पारेषण परवाना मंजुरीसाठीचा अर्ज कृपया पाहावा.

५. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या परिशिष्ट व जोडपत्रांसह आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर किंवा

आयोगाच्या कार्यालयात कोणत्याही व्यक्तीला पाहता येईल. अर्जाची प्रत त्यासोबतच्या परिशिष्ट व जोडपत्रांसह आयोगाच्या कार्यालयात खालील शुल्क अदा केल्यास उपलब्ध करुन देण्यात येईल :

अ. सविस्तर अर्जाचे दस्तऐवज (इंग्रजीमध्ये) (प्रती पान रु. २/- अदा केल्यास)

ब. सीडीमधील सविस्तर अर्जाचे दस्तऐवज (इंग्रजीमध्ये) (रु. ५०/- रोखीने अथवा मविनिआच्या नावे काढलेल्या व मुंबई येथे देय असलेल्या डीडी/धनादेशाद्वारे अदा केल्यास)

६. वर्तमानपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या वरील अर्जाच्या नोटीशीच्या संदर्भात, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५(२)(एक) अंतर्गत जनतेकडून सूचना आणि हरकती, आणि कलम १५(४) अंतर्गत **महाराष्ट्राच्या राज्य पारेषण कंपनी (एसटीयु)**कडून शिफारशी प्राप्त झाल्या आहेत.

७. विद्युत अधिनियम, २००३च्या कलम १५ (४) प्रमाणे, राज्य पारेषण कंपनीने अशी शिफारस केली आहे की, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४च्या भाग दोन मधील सर्वसाधारण अटी आणि शर्ती : **पर्याय २** खाली आरइन्फ्राला पारेषण परवाना, त्यांच्या विद्यमान पारेषण जाळ्यासह त्यांच्या सध्या उभारण्यात येत असलेल्या पारेषण प्रकपांकरिता, जे राज्य पारेषण कंपनीच्या आराखड्यात आहेत आणि ज्यांना मा. आयोगाने मान्यता दिलेली आहे आणि जे ऊर्जा मंत्रालयाने दिलेल्या स्पष्टीकरणास अनुसरुन आहेत, त्यांना पारेषण परवाना देण्यात यावा. या शिफारशीत असे नमूद करण्यात आले की, राष्ट्रीय वीज दर धोरणाच्या खंड ५.१ आणि खंड ७.१ संबंधी ऊर्जा मंत्रालयाने निर्गमित केलेल्या स्पष्टीकरणाप्रमाणे, हे स्पष्टपणे दिसून येते की, राज्य पारेषण कंपनीच्या ज्या प्रकल्पांकरिता दि. ५/१/२०११ रोजी किंवा त्यापूर्वी ठोक वीज पारेषण करार (बीपीटीए)/पारेषण सेवा करार (टीएसए) स्वाक्षरी करण्यात आलेले असतील असे प्रकल्प वगळता, उर्वरीत प्रकल्पांसाठी वीज दरावर आधारित स्पर्धात्मक बोली लागू राहील आणि त्यामुळे आरइन्फ्राला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ च्या भाग दोन मधील सर्वसाधारण अटी आणि शर्तीः पर्याय २ खाली पारेषण परवाना देण्यात यावा.

८. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ (२)(दोन) खाली केंद्र शासनाकडून अद्यापपर्यंत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही.

९. आर-इन्फ्राचे नोंदणीकृत कार्यालय एच-ब्लॉक, पहिला मजला, धिरुभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई – ४०० ७१० येथे आहे.

१०. आरइन्फ्राला, **पर्याय १ (महाराष्ट्र राज्य) किंवा पर्याय २ अंतर्गत मुंबईतील आणि मुंबईच्या परिसरातील उपनगरामधील विविध भार केंद्रांना आंतरजोडणीसाठी डहाणू येथील निर्मिती केंद्रे आणि विस्तारित यंत्रणेमधून त्यांच्या विद्यमान पारेषण जाळ्याकरिता आणि राज्य पारेषण कंपनीच्या आराखड्यात असलेल्या आणि मा. आयोगाने मान्यता दिलेल्या सध्या उभारण्यात येत**

**असलेल्या पारेषण प्रकल्पांकरिता**, पारेषण परवाना आयोगाने मंजूर करण्यासंदर्भातील प्रस्तावासंबंधी **सूचना किंवा हरकती**, असल्यास, त्या मागविण्यासाठी विद्युत अधिनयम, २००३ च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) नुसार, याद्वारे नोटीस देण्यात येत आहे. या **सूचना किंवा हरकती** वरील पत्त्यावर आयोगाकडे **सोमवार, दि. २५ जुलै, २०११** रोजी किंवा त्यापूर्वी खाली सही करणाऱ्यास प्राप्त होतील अशा बेताने पाठवाव्यात. या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१३. इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या **सूचना किंवा हरकती**, असल्यास, इंग्रजी किंवा मराठी भाषेत, ६ प्रतींमध्ये, त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेल आयडी, असल्यास, त्यासह पाठवाव्यात. तसेच **सूचना किंवा हरकती** कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहकांच्या वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. तसेच सूचना किंवा हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणणे आयोगासमोर व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास तसे देखील त्यात नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला आयोगातर्फे **बुधवार, दि. २७ जुलै, २०११ रोजी ११.०० वाजता, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्र. १, १३वा मजला, कफ परेड, मुंबई – ४०० ००५ येथील आयोगाच्या कार्यालयात** होणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही. या सुनावणीमध्ये पर्याय १ (महाराष्ट्र राज्य) **किंवा** पर्याय २ अंतर्गत मुंबईतील आणि मुंबईच्या परिसरातील उपनगरामधील विविध भार केंद्रांना आंतरजोडणीसाठी डहाणू येथील निर्मिती केंद्रे आणि विस्तारित यंत्रणेमधून त्यांच्या विद्यमान पारेषण जाळ्याकरिता आणि राज्य पारेषण कंपनीच्या आराखड्यात असलेल्या आणि मा. आयोगाने मान्यता दिलेल्या पारेषण प्रकल्पांकरिता अर्जदाराला पारेषण परवाना देण्यासंबंधी विचार करण्यात येईल.

(कुलदीप ना. खवारे)
सचिव, मविनिआ

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३ जुलै, २०११